प्रेसनोट दिनांक – १७/०८/२०१७

---

**नामचीन सराईत गुंड मुज्जमील ऊर्फ मुज्जु मजिद खान पुणे शहर व जिल्हयातुन दोन वर्षासाठी तडीपार**

---

मा. रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. रविंद्र कदम पोलीस सह आयुक्त पुणे यांनी आगामी काळात पुणे शहरात मोठया प्रमाणात साजरा होणारे गणेशोत्सव व नवरात्र उत्सवाचे काळात कोणताही अनुचित प्रकार घडु नये व आपले गुन्हेगारी कृत्याने वर्चस्व निर्माण करणारे टोळींचा समुळ नायनाट करण्यासाठी व त्यांचेविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

खडक पोलीस स्टेशन पुणे चे अभिलेखावरील सराईत व अटटल गुन्हेगार **मुज्जमील ऊर्फ मुज्जु मजिद खान वय – २४ रा – २२० गंज पेठ मोमीनपुरा पुणे** याचेविरुध्द खडक पोलीस स्टेशन पुणे येथे दुखापतीचा एक, गंभीर स्वरुपाचे घातक शस्त्र जवळ बाळगल्याचे दोन, पिंपरी पोलीस स्टेशन पुणे येथे जबरी चोरीचा एक व चिंचवड पोलीस स्टेशन पुणे येथे चोरीचा एक असे एकुण पाच गुन्हे दाखल आहेत तसेच त्याचेविरुध्द सन २०१५ सालामध्ये त्याने कोणत्याही प्रकारे शांतताभंग होईल असे कृत्य करु नये म्हणुन प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती परंतु त्याचे वागण्यामध्ये काहीही फरक पडलेला नव्हता.

नमुद गुंड मुज्जमील ऊर्फ मुज्जु मजिद खान याचेविरुध्द वेळोवेळी कारवाई करुनही त्याचे वागणुकीत काहीएक फरक पडलेला नव्हता तो लोकांना रस्त्यामध्ये अडवुन दमदाटी करुन प्रसंगी शस्त्राचा धाक दाखवुन त्यांचेजवळील पैसे व इतर माल काढुन घेत होता. त्याने या भागात आपली भयंकर दहशत निर्माण केली होती त्याचे दहशतीमुळे व भितीपोटी त्याचेविरुध्द कोणीही तक्रार देण्यास पुढे येत नव्हते त्याचे अशा कृत्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे मनात भिती निर्माण होवुन त्याचे जिवितास व मालमत्तेस धोका निर्माण झाला होता. **म्हणुन त्यास पुणे शहर व जिल्हयामधुन हददपार करण्याबाबतचा प्रस्ताव डॉ. बसवराज तेली पोलीस उप आयुक्त परिमंडळ - १ पुणे शहर यांचेकडे पाठविण्यात आला होता त्यानुसार त्यांनी त्यास पुणे शहर व पुणे जिल्हा कार्यक्षेत्रामधुन दोन वर्षाकरिता तडीपार केलेले आहे.** अशाप्रकारे आगामी गणेशोत्सव व नवरात्रौ उत्सव व बकरी ईद सणाचे काळात कोणताही अनुचित प्रकार घडु नये त्या अनुषंगाने पोलीसांनी समाजकंटक सराईत व अटटल गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले असुन त्यांचेविरुध्द कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत पोलीसांनी दिले आहेत.

शहर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्री. बाजीराव मोहीते यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र मोकाशी व श्री संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक (गुन्हे) व पोलीस उप निरीक्षक आनंत व्यवहारे, संजय गायकवाड व पोलीस कर्मचारी सर्फराज शेख, महेश बारवकर, महेश कांबळे, समीर सावंत, अनिकेत बाबर, यांनी सदर कारवाई मध्ये भाग घेवुन प्रस्ताव तयार केलेला आहे.